# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## बांधकाम विभाग, प्रभाग समिती क्रमांक-०५

## कोटेशन नोटीस

प्रसिद्ध दि. २९/०३/२०१८

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडील खालील नमुद कामासाठी मान्यता प्राप्त ठेकेदार यांचे कडून टक्केवारी दराचे दरपत्रक दि. ३१/०३/२०१८ रोजी दु.१.०० वा. पर्यंत मागविण्यात येत आहेत. सदरच्या कामाची संपूर्ण माहिती बांधकाम विभागाकडुन घेवुनच कोटेशन भरावीत. ठेकेदाराने परिपूर्ण भरलेले दरपत्रक महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात जमा करावे. दरपत्रक हे स्वःताच्या लेटरपॅडवर देणेचे बंधनकारक आहे. दर भरताना सर्व करासहित दर भरावेत. त्यानंतर कोणत्याही जादा दराचा विचार केला जाणार नाही. सदर कामाचा मोबदला प्रकल्पाच्या किमतीच्या प्रमाणांत देण्यात येईल. तसेच कामाच्या प्रत्येक स्टेज प्रमाणे देयक अदा केले जाईल.

सदर दरपत्रकाबाबतची अधिक माहिती उप-अभियंता व शहर अभियंता बांधकाम विभाग यांचेकडून सुट्टीचे दिवस खेरीज करुन कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत मिळू शकेल. दरपत्रक कमी किंवा जास्त दराची दरपत्रके स्विकारणे अथवा सर्वच दरपत्रके नाकाराण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. कोणत्याही कारणास्तव उशिरा आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

---

कामाचे नावः-

१) वार्ड क्रमांक ६ क मधील हमालवाडा, कबड्डी मैदान परिसरातील गटार व पाथवेज बनविणेबाबत.
अंदाजपत्रकीय रक्कम रुपये- ८५,६६९/-

२) वार्ड क्रमांक ६ क मधील दर्गा रोड, चार चाळ कब्रस्थान परिसरात गटार व पाथवेज बनविणेबाबत.
अंदाजपत्रकीय रक्कम रुपये-१,६३,५८१/-

शहर अभियंता
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी.

---

सदरची कोटेशन नोटीस आज दि.३१/०३/२०१८ पुर्वी महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन महानगरपालिच्या बांधकाम विभागाकडील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आली आहे.